

रयत शिक्षण संस्थेचे,

# डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर

ता. पलूस, जि. सांगली



दि. ४ मार्च २०२१

## मराठी विभाग

## विज्ञान दिनानिमित्त पोस्टर प्रेझेंटेशन

अहवाल

गुरुवार, दिनांक ४ मार्च २०२१ रोजी महाविद्यालयामध्ये विज्ञान दिनाचे औचित्य साधून पोस्टर प्रेझेंटेशन घेण्यात आले. त्यामध्ये मराठी विभागाने सक्रीय सहभाग घेतला. मराठी विभागाकडून छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजमुद्रेच्या पोस्टरचे विद्यार्थ्यांनी सादरीकरण केले. मराठी भाषेतील पहिला राजभाषा कोशाची निर्मिती छत्रपती शिवाजी महाराजांनी केली होती. राजकारभारातील फारशी, आरबी शब्दांच्या अतिरेकाला आळा बसावा आणि सर्वसामान्य रयतेच्या तोंडची मराठी भाषा राजकारभारासाठी उपयोगात यावी, यासाठी त्यांनी हा प्रयत्न केला होता. छत्रपती शिवाजीराजे जेव्हा पुण्याचा कारभार पाहू लागले, तेव्हा त्यांना शहाजीराजांनी स्वतंत्र राजमुद्रा तयार करून दिली. ही राजमुद्रा संस्कृत भाषेत होती. ती खालीलप्रमाणे-

"प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता ॥

शाहसुनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते ॥" तिचा मराठी अर्थ -

प्रतिपदेचा चंद्र जसा कले कलेने वाढत जातो, आणि साऱ्या विश्वात वंदनीय होतो, तशीच शहाजींचा पुत्र शिवाजी महाराजांच्या मुद्रेचा लौकिक वाढत जाईल. असा होता.

अशाप्रकारे विद्यार्थ्यांनी भेट देणाऱ्यांना शिवाजी महाराजांच्या भाषाविषयक कार्याची माहिती दिली.

**निष्पत्ती :** विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराज यांचे भाषाविषयक कार्य समजले.

**लाभार्थी :** महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी



मराठी विभागप्रमुख

प्राचार्य
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय,
रामानंदनगर (बुर्ली), ता. पलूस, जि. सांगली.